महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याबाबत. छाननी समितीस मुदतवाढ देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

## शासन निर्णय क्रमांकः मग्रारो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २८ एप्रिल, २०२०.

**वाचा -**

१) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०, दि. ८.६.२०१०

२) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०,दि. ३.८.२०११

३) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः मग्रारो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०, दि. १७.०६.२०१६

४) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०, दि. २९.०८.२०१७

५) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०, दि. १६.०४.२०१८

६) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०१९/रोहयो/जन-६/कावि-२०४, दि. २५.०२.२०१९

७) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक-मग्रारोहयो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०, दि.२९.०३.२०१९

**प्रस्तावना -**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गतच्या कामांना प्रशासकीय तांत्रिक मंजुरी देण्यापूर्वी प्रस्तावाची छाननी करण्याकरीता संदर्भाधीन शासन निर्णय दि. १७ जून, २०१६ अन्वये छाननी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २९ मार्च, २०१९ अन्वये दि. १७ मार्च, २०२० पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. तथापि छाननी समित्यांच्या नियमितपणे व वेळेवर बैठका होत नसल्याने कामे मंजूर करण्यात विलंब होत आहे व त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीवर विपरित परिणाम होत असल्याची बाब निदर्शनास येत आहे. तेव्हा शासन खालील निर्णय घेत आहे.

Scanned with CamScanner

शासन निर्णय-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत औरंगाबाद विभागातील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी प्रस्तावांची छाननी करण्याकरीता संदर्भात दिलेल्या शासन निर्णय गठीत केलेल्या समित्यांनी योजनेअंतर्गत सर्व रस्त्याच्या कामाची छाननी करावी. इतर कामाची प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी छाननी समितीच्या मान्यतेची आवश्यकता यापुढे राहणार नाही. शासन निर्णय दि. १७ जून, २०१६ च्या इतर अटी व शर्ती यथास्थित लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ल.ध.वरखाडे)

उपसचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक,
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. नरेगा आयुक्त, नागपूर
९. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१०.प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,

Scanned with CamScanner